K. C. E. Society's
**Moolji Jaitha College**
An 'Autonomous College' Affiliated to
K.B.C. North Maharashtra University, Jalgaon.
NAAC Reaccredited Grade - A (CGPA : 3.15 - 3rd Cycle) |
UGC honoured "College of Excellence"
Dept. of Biotechnology, Ministry of Science & Technology honoured
"Star College" | DST(FIST) Assisted College

KNOWLEDGE IS POWER
ESTD. 1945

के. सी. ई. सोसायटीचे
**मूळजी जेठा महाविद्यालय**
क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित
'स्वायत्त महाविद्यालय'
नॅकद्वारा पुनर्मानांकित श्रेणी – 'ए' (सी.जी.पी.ए. : ३.१५ – तिसरी फेरी)
विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा घोषित 'कॉलेज ऑफ एक्सलन्स'
भारत सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान विभागातर्फे
घोषित 'स्टार कॉलेज'। डी.एस.टी. (फीस्ट) अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त

दि.02.01.2021

**परीक्षा विभाग**

परिपत्रक क्र. ५५/२०२१

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०- २१ मधील प्रथम/ द्वितीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या परीक्षांचे आयोजन करणेबाबत...**

**संदर्भ:**

**१) परिपत्रक क्र. परीक्षा ३३/२०२० दि. ४.९. २०२०**

**२)** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रं. संकिर्ण-२०२०/प्र.क्र. १२३/विशि- ३,दि. ०८ मे २०२०

उपरोक्त संदर्भ क्रं. १ व २ नुसार **स्वायत्त महाविद्यालय परीक्षा विभागाने दि. १२.११.२०२० रोजी झालेल्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम/ द्वितीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी** MCQ **पद्धतीने** Online **पद्धतीने घेण्यात येणार आहेत.**

**वरील बाबींच्या अनुषंगाने स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.**

| **Class** | **Semester** | **Expected Date of Examination** |
|---|---|---|
| Second Year B.A., B.Sc., B.Com., B.C.A., B.B.A., B.Voc, M.A., M.Sc., M.Com (Students Admitted in Academic Year 2020-21) | III | 1 February 2021 |
| First Year B.A., B.Sc., B.Com., B.C.A., B.B.A., B.Voc | I | 1 April 2021 |
| First Year UG (Students Admitted in Academic Year 2019-20) | I, II | 1 April 2021 |
| First Year M.A., M.Sc., M.Com (Students Admitted in Academic Year 2020-21) | I | 2 May 2021 |
| First Year PG (Students Admitted in Academic Year 2019-20) | I, II | 2 May 2021 |

**१. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी** M.C.Q. **पॅटर्ननुसार परीक्षा घेण्यात येतील.**

**२.** Online **परीक्षा देतांना विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वर्षी प्रवेश घेतेवेळी जो युजर आयडी आणि पासवर्ड वापरून प्रवेश घेतला होता त्याचाच वापर करून लॉगिन करावे.**

**३. लॉगिन केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या** Dashboard **वर असलेल्या** Examination Section **वर क्लिक केल्यानंतर विद्यार्थी ज्या विषयाची परीक्षा द्यावयाची असेल त्या विषयासमोरील लिंकवर क्लिक करून परीक्षा देता येईल.**

परीक्षा नियंत्रक
मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त)
जळगाव

४. परीक्षार्थी विद्यार्थ्यांना पेपर सुरू झाल्यापासून अर्धा तास होईपर्यंत पेपरची लिंक उपलब्ध असेल. त्यानंतर लिंक बंद करण्यात येईल.

५. सर्व विभागप्रमुखांनी परीक्षेशी संबधीत माहिती सोशल मिडिया, सूचना फलक यांच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी.

६. विद्यार्थ्यांना ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणी राहूनच परीक्षा देता येईल आहे. मात्र ज्याच्या जवळ लॅपटॉप नसेल अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या संगणक कक्षात परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले विकल्पपत्र भरणे आवश्यक असेल.

७. विकल्पपत्र न भरता जो विद्यार्थी महाविद्यालयात परीक्षा देण्यासाठी येईल अशा विद्यार्थ्याला महाविद्यालयात परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून देता येणार नाही.

- महाविद्यालय अधिकार मंडळाने निच्छित केलेले परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील.

१. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील परीक्षांसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ स्वरूपात/ बहुपर्यायी Multiple Choice Question (MCQ) असेल व परीक्षेसाठी एकूण गुण पॅटर्ननुसार राहतील.

२. पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेत ४० प्रश्न विचारले जातील. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य असेल.

३ . परीक्षेचा कालावधी पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ६० मिनिटे आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ९० मिनिटाचा असेल.

४. या परीक्षेकरीता Negative Marking पद्धत लागू राहणार नाही.

- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या परीक्षेसाठी फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध होणार नाही.
- या परीक्षेचे वेळापत्रक यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना परीक्षा देतांना तांत्रिक अडचण येऊ नये आणि परीक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या Software ची ओळख व्हावी म्हणून परीक्षेपूर्वी Mock test घेण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना सदर Mock test देणे अनिवार्य असेल.

(डॉ. जे. एन. चौधरी)
परीक्षा नियंत्रक

(प्रा. डॉ. सं. ना. भारंबे)
प्राचार्य
02/9/2021